MBMC/MS/IWL/2018/264

10 रु. Rs.10 INDIA TEN RUPEES दस रुपये 9 APR 2018

# केंद्रशासनाचा माहिती मिळविण्याचा अधिकार २००५

## नमुनापत्र - ३

### माहिती मिळविण्याकरीता करावयाच्या अर्जाचा नमुना

स.प./न.प./ज.प./आ.क्र. 35 दिनांक :- 11/04/18

स्था. प्र. 15 नगर सचिव

प्रति,
शासकिय माहिती अधिकारी,
मा० नगर सचिव सो० M.B.M.C.

१) अर्जदाराचे नाव – प्रकाश नामदेव आहिरे,

२) पत्ता दत्ता सदन बिल्डींग समोर बंदरवाडी नाका, भाईंदर रेल्वे स्टेशन समोर, भाईंदर (पुर्व.) ४०११०५ (म) 9970082931

३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल :-

(एक) माहितीचा विषय :- दि १३/१०/२००१ रोजीच्या प्रकरण क्र २२ ठराव क्र २७५

(दोन) माहितीशी संबधित कालावधी :- ची अपेक्षीलेली ठरावांची प्रत मिळणे बाबत.

(तीन) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन :-

दि १३/१०/२००१ रोजीच्या प्रकरण क्र २२ ठराव क्र २७५ ची अपेक्षीलेली ठरावांची प्रत मिळणे. बाबत गटई स्टॉल / पीच परवाना / भू. भाडे या संदर्भात इत्यंभूत माहिती मिळणे बाबत.

(चार) माहिती टपालाद्वारे किंवा व्यक्तीशः आवश्यक आहे किंवा कसे (प्रत्यक्ष टपाल खर्च अतिरिक्त शुल्कामध्ये समाविष्ट केला जाईल.) :- व्यक्तीशः

(पाच) टपालाद्वारे असेल त्याबाबतीत (सर्वसाधारण, नोंदणीकृत किंवा शीघ्र) :- व्यक्तीशः

(सहा) ज्यासाठी माहिती आवश्यक आहे ते प्रयोजन :- गटई स्टॉल नुतनीकरणे बाबत.

ठिकाण :- भाईंदर (पुर्व)

दिनांक :- 09/04/2018

अर्जदाराची स्वाक्षरी

श्री. प्रकाश नामदेव आहिरे

प्रकाश आहिरे

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./३६ /2017-18

दिनांक :- १२/०४/2018

प्रति,
श्री. प्रकाश नामदेव अहिरे
रुम. नं. 678/14, प्रविण गावडे चाळ,
जुचंद्र रेल्वे फाटकजवळ, जुचंद्र गाव,
ता. वसई, जि. पालघर.

विषय :- केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार 2005.
दि. 13/10/2001 रोजीच्या प्रकरण क्र. 22, ठराव क्र. 277 या ठरावाची प्रत मिळणेबाबत.

संदर्भ :- आपणांकडील दि. 09/04/2018 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये आपण दि. 13/10/2001, प्रकरण क्र. 22, ठराव क्र. 277 या ठरावाच्या प्रतीची मागणी केलेली आहे. त्याअनुषंगाने आपणास मा. स्थायी समिती सभा दि. 13/10/2001 प्रकरण क्र. 22, ठराव क्र. 277 या ठरावाची प्रत या पत्रासोबत जोडून देत आहोत.

सदर माहितीबाबत आपले समाधान न झाल्यास अपिलीय अधिकारी तथा प्र. नगरसचिव श्री. वासुदेव शिरवळकर, नगरसचिव विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात प्रथम अपिल दाखल करता येईल.

कळावे.

प्रकाश आहिरे
१३/४/१८

(कैलास दा. म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी तथा लिपीक
मिरा भाईंदर महानगरपालिका
(भ्रमणध्वनी क्र. 9867077799)

pc 2D:\Mahiti Adhikar\Letter - Prakash Ahire.docx

# मिरा भाईंदर नगरपालिका परिषद
# मा. स्थायी समिती सभा दि. १३/१०/२००१

**विषय क्र. २२ :-** **शासनाचे आदेशाप्रमाणे सध्या कार्यरत असलेल्या गटई कामगारांना रस्ता रुंदीकरण सोडून जागा देणे व बाजार ठरवणेबाबत विचार विनिमय करणे.**

**ठराव क्र. २७७ :-**

शासनाचे आदेशानुसार नगरपरिषदेने गटई कामगारांना नगर परिषद रस्त्यावर बूथ / खोका टाकण्याची परवानगी दिलेली आहे.

दि. ______ च्या ठरावानुसार नगरपरिषदेच्या रस्त्यावर किंवा मालकीच्या मालमत्तेमध्ये सर्व अपंग टेलिफोन बुथ / इतर बुथ यांचे नाहरकत दाखले रद्द करण्यांत आले आहेत.

नगरपरिषदेने मोठ्या प्रमाणावर मुख्य व इतर रस्त्यांचे रुंदीकरण हाती घेतले आहे. सदर रुंदीकरण सोडून रहदारीस अडथळा न येता गटई कर्मचाऱ्यांना बूथच्या जागा निश्चित करुन नगरपालिका अधिनियम कलम ९२ अन्वये त्यांना भाडेपट्टी आकारण्यात यावी असा मी ठराव मांडीत आहे.

**सूचक :- श्री. मोहन पाटील**
**अनुमोदन :- श्री. प्रकाश ठाकूर**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**मिरा भाईंदर नगरपालिका**